दिनांक 07/03/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.180

विषय – लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.5 मधील नेहरूनगर कदमवाडा येथील श्री विक्रम भिंगारदेवे यांचे घरापासून पूर्व बाजूस श्री रघुनाथ शिंदे घर ते दक्षिण बाजूस विठ्ठल तुपे यांच्या घरापर्यंत विद्युत पोल उभे करणे कामातील तांत्रिक अडचण असलेने कामास मुदतवाढ मिळणेबाबत मलिक इलेक्ट्रिकल्स यांच्या दि. 03 मार्च 2025 रोजीच्या दाखल अर्जावर निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विदयुतअभियंता यांची दिनांक 05/03/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) इकडील पत्र जा क्र. 3510 दि. 15 जानेवारी 2025

3) मलिक इलेक्ट्रिकल्स यांचा दि. 03 मार्च 2025 रोजीचा अर्ज

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.5 मधील नेहरूनगर कदमवाडा येथील श्री विक्रम भिंगारदेवे यांचे घरापासून पूर्व बाजूस श्री रघुनाथ शिंदे घर ते दक्षिण बाजूस विठ्ठल तुपे यांच्या घरापर्यंत विद्युत पोल उभे करणे या कामाचा कार्यादेश क्र. 2566 दि.15 ऑक्टोबर 2024 रोजी दिलेला आहे. सदर कामाची मुदत 3 महिने महिने होती. ठेकेदार यांचे मागणीनुसार सदर कामास प्रशासकीय ठराव क्र. 160 दि. 10 जानेवारी 2025 ने 45 दिवसांची मुदतवाढ देणेत आलेली आहे. संदर्भ क्र.3 अन्वये ठेकेदार मलिक इलेक्ट्रिकल्स यांनी कामात तांत्रिक अडचण असलेचे कारण नमूद करून कामास मुदतवाढ मागितली आहे. सदर ठिकाणी स्थळ पाहणी केली असता कामास सुरवात झाली असलेचे दिसून येत आहे, परंतु काम पूर्ण करण्यास कालावधी लागणार असल्याने मलिक इलेक्ट्रिकल्स यांना दिनांक 25/03/2025 पर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा